**<u>सेशन केस क्र ११ सन २०१८</u>** **निशाणी ४६**

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ४ ची साक्ष

मी या द्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

माझे नाव - अशोक बाळू केदार,
वय सुमारे - २५ वर्ष
उद्योग - वाहन चालक
निवास स्थान - पोखरी बाळेश्वर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर.

**<u>इन कॅमेरा</u>**

**<u>सरतपासणी - सहायक सरकारी वकील श्री. जे. के. दिवटे यांचेतर्फे -</u>**

१. दिनांक ०७.१२.२०१७ रोजी मला घारगांव पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. तेथे गिताराम बर्डे हा आरोपी व पोलीस होते. तो आरोपी आज न्यायालयात हजर आहे. आरोपीने सांगितले की, अत्याचार झाला, ते घर दाखवितो. आरोपीने ओढयाच्या बाजूला शिवाजी कचरे यांच्या घरी आम्हाला नेले. ते घर कौलारू होते, घरासमोर ओटा होता व घराच्या बाजूला ओढा होता. पोलीसांनी त्याबाबतचा पंचनामा केला व तो मला वाचून दाखविला. तो बरोबर असल्यामुळे मी त्यावर सही केली. मला आता तो पंचनामा दाखविला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४७** दिला.

सरतपास पूर्ण.

***<u>उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री जे. एच. वामन मार्फत</u>***

२. मला कोणत्या साहेबांनी पोलीस ठाण्यात बोलविले, हे मला लक्षात नाही. यापूर्वी मी पंच म्हणून काम केलेले नाही. मी पोलीस ठाण्यात गेलो तेव्हा साहेबांच्या केबीनमध्ये आरोपी कडेला बसलेला होता, हे म्हणणे खरे आहे. पोलीस अधिकारी व इतर लोक तेथे होते, हे म्हणणे खरे आहे. घर कोठे आहे, असे पोलीस अधिकारी त्याला धमकावून विचारत होते, हे म्हणणे खरे नाही. घटनास्थळी आम्ही जीपने गेलो. साहेब जीपमध्ये पुढे बसले होते व आरोपी मागे बसला होता, हे माझ्या लक्षात नाही. आम्ही कोणत्या मार्गाने गेलो, हे मला सांगता येणार नाही. त्यावेळी आरोपीला बेडया घातल्या होत्या का नाही, हे मला

सांगता येणार नाही. पंचनाम्याच्या वेळी मी वयाने अज्ञान होतो, हे म्हणणे खरे नाही. पोलीसांनी जीप थेट घरापाशी थांबविली का हे मला लक्षात नाही. सदर घराच्या चर्तु:सिमा मला सांगता येणार नाही. पंचनामा पोलीस ठाण्यात तयार केला व तिथेच आमच्या सहया घेतल्या, हे म्हणणे खरे आहे.

३. मी घटनास्थळी गेलो व त्याठिकाणी आरोपीने घर दाखविले, हे मी खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही. आरोपीने माहिती दिल्याप्रमाणे आम्ही घटनास्थळी गेलो, हे मी खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही. घटनास्थळाचा पंचनामा केला, हे मी खोटे सांगतो, हे म्हणणे खरे नाही. पंचनामा आज मला शिकविला म्हणून मी साक्ष दिली, हे म्हणणे खरे आहे.

उलटतपास पूर्ण.

**<u>फेरतपासणी - सहायक सरकारी वकील श्री. जे. के. दिवटे यांचेतर्फे -</u>**

४. पंचनामा मी वाचला व त्यावर माझी सही असल्यामुळे मी साक्ष दिली. शिकविल्यामुळे साक्ष दिली नाही.

फेरतपास पूर्ण.

फेरउलटतपास नाकारला.

श्रवणोत्तर स्विकृती,

Sd/---

संगमनेर
दिनांक १५/१०/२०२५

( मंदार नेरलेकर )
अति. सत्र न्यायाधीश
संगमनेर